लोकमत

# विद्यार्थिनींनी सलग १२ तास वाचन करून वाहिली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली

## एस. चंद्रा महिला महाविद्यालय : प्राध्यापकांनी दिले प्रोत्साहन

लोकमत न्यूज नेटवर्क



आमगाव येथील एस.चंद्रा महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वाचन करीत असलेल्या विद्यार्थिनीं

**आमगाव :** स्थानिक एस. चंद्रा महिला महाविद्यालय येथे ग्रंथालय, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, करिअर कट्टा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, आय.क्यू.एसी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १३ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थिनींनी सलग १२ तास वाचन करून आदरांजली वाहिली. तसेच याच उपक्रमातून नाचून नव्हेतर, वाचून जयंती साजरी करण्याचा प्रबोधनपर संदेश देण्यात आला.

१३ एप्रिल रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात सकाळी ७ वाजतापासून समूह वाचनाला सुरुवात करण्यात आली व संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सतत वाचन महाविद्यालयातील विद्यार्थिनींद्वारे करण्यात आले. यावेळी प्राचार्या डॉ. तृष्णा कळंबे, प्रा. डॉ. ललितकुमार ठाकूर, ग्रंथपाल डॉ. कमलेश पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दीक्षा बडोले, आय.क्यू.एसी. समन्वयक डॉ. स्वप्निल भगत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. आशिष थूल, करिअर कट्टा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रमुख डॉ. प्रमोद सरदार, डॉ. देवानंद खोब्रागडे, प्रा. पूजा जांभूळकर आदी उपस्थित होते.

प्राचार्या डॉ. तृष्णा कळंबे यांनी '१२ तास वाचन' या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भारतीय घटनेचे शिल्पकार, मानवतेचे पुजारी, समतेचे पुरस्कर्ते व भारतरत्न म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. त्यापलीकडे त्यांना 'ग्रंथवेडा' असेदेखील म्हटले जाते. त्यांना लहानपणापासूनच ग्रंथ वाचनाची सवय होती. त्यांचे वाचन इतके दांडगे होते की ते एखाद्या वाचलेल्या पुस्तकातील महत्त्वाची माहिती ते टिपण न काढतासुद्धा त्यांना ते स्मरण राहत असे. अशा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी 'सलग १२ तास समूह वाचन' हा उपक्रम राबविल्याचे सांगितले.

### कार्यक्रमासाठी यांनी केले सहकार्य

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. अजय मून, प्रा. सौरभ बागडे, प्रा. उत्तरा तागडे, डॉ. चंदा गावंडे, डॉ. मंजू काठाने, यशोदा हेमणे, प्रीती चुटे, प्रणाली मेश्राम, विश्वतारा भांडारकर तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी राजेश हातझाडे, हेमकृष्ण काठाने, जयेश सहारे, मंगल गोंडाणे, थानसिंग ठाकूर, अमर गोडसे, वर्षा वांडरे, निर्दोष सहारे, विनोद डोंगरवार, अश्विन फुंडे, सुरेंद्र परिहार यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. कमलेश पाटील यांनी मांडले. गेल्या पाच वर्षापासून महाविद्यालयात हा उपक्रम राबवित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोकमत

# एस.चंद्रा महिला महाविद्यालय आमगाव



**आमगाव :** स्थानिक एस.चंद्रा महिला महाविद्यालय येथे ग्रंथालय विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे माजी राष्ट्रपती भारतरत्न स्व.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. याचेच औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्याचे आले होते. प्राचार्य डॉ.तृष्णा कळंबे यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ.ललीतकुमार ठाकूर, प्रा.कमलेश पाटील, ग्रंथालय समिती सदस्य प्रा.दीक्षा बडोले, तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.आशिष थूल उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नंदिनी मेश्राम यांनी केले. आभार रितू रहांगडाले यांनी मानले.

Hello Gondia
Page No. 2 Oct 16, 2025
Powered by: erelego.com

लोकमत




कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित तृष्णा कळंबे, ललीतकुमार ठाकूर व विद्यार्थिनी.

# एस.चंद्रात राष्ट्रीय आवर्तसारणी दिन साजरा

**आमगाव :** स्थानिक एस. चंद्रा महिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय आवर्तसारणी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. रसायनशास्त्र विभागातर्फे हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे व डॉ. ललित कुमार ठाकुर, प्रा. डॉ. चंदा गावंडे, डॉ. स्वप्नील भगत, डॉ. प्रमोद सरदार डॉ. देवानंद खोब्रागडे, डॉ. अजय मून, प्रा. दीक्षा बडोले, डॉ. कमलेश पाटील, डॉ. आशिष थूल प्रा. उत्तरा तागडे, प्रा. सौरभ बागडे, डॉ. मंजू कठाने यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. डॉ. तृष्णा कळंबे यांनी दैनंदिन जीवनामध्ये मूलद्रव्यांचे महत्त्व मार्गदर्शनात सांगितले. डॉ. ललित कुमार ठाकूर यांनी मूलद्रव्यांचा योग्य अभ्यास करणे किती गरजेचे आहे, त्याविषयी जिज्ञासा विद्यार्थ्यांमध्ये असणे गरजेचे आहे याचे महत्त्व विशद केले.

Hello Gondia
Page No. 3 Feb 26, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# एस. चंद्रा महिला महाविद्यालयात अँन्टी रॅगिंग आठवडा उत्साहात



लोकमत न्यूज नेटवर्क

**आमगाव :** येथील एस. चंद्रा महिला महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २०२३ च्या निर्णयानुसार १२ ऑगस्ट रोजी अँटी रॅगिंग दिन, तर १२ ते १८ ऑगस्टदरम्यान अँटी रॅगिंग आठवडा साजरा केला जातो. यानिमित्त महाविद्यालयाच्या अँटी रॅगिंग समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे विविध कार्यक्रमांचे करण्यात आले होते.

आठवड्याचे उद्घाटन १२ ऑगस्ट रोजी पार कार्यकारी प्राचार्या डॉ. तृष्णा कळंबे यांच्या अध्यक्षतेत करण्यात आले. याप्रसंगी डॉ. चंदा गावंडे, प्रा. दीक्षा बडोले, अँटी रॅगिंग समितीप्रमुख प्रा. कमलेश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष थूल उपस्थित होते. डॉ. थूल यांनी अँटी रॅगिंग आठवड्यामध्ये आयोजित घोषवाक्य, पोस्टर मेकिंग व निबंध स्पर्धेचा विषय तसेच नियमांची जाणीव करून दिली. तसेच विद्यार्थिनींनी कशा पद्धतीने अँटी रॅगिंग राष्ट्रीय स्पर्धा-२०२५ मध्ये सहभागी होण्याचे नियम तसेच पुरस्कार संबंधित सखोल माहिती देत जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले. प्राचार्या डॉ. कळंबे यांनी अँटी रॅगिंगसंदर्भात असलेले कायदे तसेच त्याच्या कठोरतेबद्दल अवगत करून देत रॅगिंगच्या दुष्परिणामांबद्दल माहिती करून दिली. याप्रसंगी विद्यार्थिनींना 'रॅगिंगचे दुष्परिणाम' या विषयावर आधारित लघुपट दाखविण्यात आले. प्रास्ताविक प्रा. पाटील यांनी मांडले. संचालन प्रगती बोपचे यांनी केले. आभार गायत्री ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. ललित ठाकूर, डॉ. देवानंद खोब्रागडे, प्रा. उत्तरा तागडे, प्रा. सौरभ बागडे, प्रा. संतोष रामटेके, डॉ. राजेंद्रपाल वैद्य, डॉ. शीतल तिरपुडे, कल्याणी हेमणे, जयेश सहारे, राजेश हातझाडे, थानसिंग ठाकूर, हेमकृष्ण कठाने, मंगल गोंडाणे, अमर गोडसे, वर्षा वांडरे, निर्दोष सहारे, विनोद डोंगरवार आदींसह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

लोकमत



कार्यक्रमात डॉ. तृष्णा कळंबे, प्रा.दीक्षा बडोले, डॉ. देवानंद खोब्रागडे व अन्य.

# बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**आमगाव :** स्थानिक महिला महाविद्यालय येथे भगवान बिरसा मुंडा यांची जयंती महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग, मराठी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आयक्यूएसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दीक्षा बडोले, डॉ. देवानंद खोब्रागडे, डॉ. स्वप्निल भगत, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष थूल उपस्थित होते. प्राचार्य डॉ. तृष्णा सुधाकर कळंबे यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्याची माहिती देत आदिवासी समाजासाठी त्यांनी केलेले कार्य किती महत्त्वपूर्ण होते याची जाणीव उपस्थितांना करून दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दीक्षा बडोले यांनी मांडले. मराठी विभागप्रमुख डॉ. देवानंद खोब्रागडे यांनी उपस्थितांना बिरसा मुंडा यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन नंदिनी मेश्राम हिने केले तर आभार रितू रहांगडाले हिने मानले.

लोकमत

# मिरवणुकीतून स्तनपान सप्ताहाची जनजागृती

## महिला महाविद्यालयाचा उपक्रम : श्रीरामटोली येथे केले होते आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क



कार्यक्रमात डॉ. तृष्णा कळंबे, दीक्षा बडोले, डॉ. चंदा गावंडे, प्रा.उत्तरा तागडे व अन्य.

**आमगाव :** येथील एस. चंद्रा महिला महाविद्यालयातील गृहविज्ञान विभाग, आहारशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामटोली येथे स्तनपान सप्ताहानिमित्त स्तनपान जनजागृती मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. तृष्णा कळंबे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. दीक्षा बडोले, डॉ. चंदा गावंडे, प्रा. उत्तरा तागडे, डॉ. आशिष थूल उपस्थित होते. प्रास्ताविकातून प्रा. बडोले यांनी, गावातील स्तनदा माता तसेच गर्भवती महिलांमध्ये स्तनपानासंदर्भात जागृती निर्माण करून मातेचे दूध हे बाळाच्या आरोग्यासाठी किती महत्त्वाचे आहे याबाबत माहिती दिली. डॉ. कळंबे यांनी महिलांमध्ये स्तनपानाबद्दल असलेले गैरसमजदूर करून त्यांना स्तनपान करण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे सांगितले. याप्रसंगी विद्यार्थिनींद्वारे श्रीरामटोली येथे मिरवणूक काढून पोस्टर व घोषणा देत स्तनपानासंदर्भात जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाला डॉ. ललित ठाकूर, डॉ. देवानंद खोब्रागडे, प्रा. कमलेश पाटील, प्रा. सौरभ बागडे, शीतल तिरपुडे, कल्याणी हेमणे, शिक्षकेतर कर्मचारी जयेश सहारे, राजेश हातझाडे, थनसिंग ठाकूर, हेमकृष्ण काठाने, मंगल गोंडाणे, अमर गोडसे, वर्षा वांडरे, निर्दोष सहारे, विनोद डोंगरवार तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येत उपस्थित होत्या.

**मातेचे दूध बाळाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे याबाबत जनजागृती करण्यात आली**